# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०३/२०२२** **दिनांक २६.०३.२०२२**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- सकाळी १०.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा शनिवार दि.२६.०३.२०२२ रोजी शिर्डी येथील संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये सकाळी १०.०० वाजता आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/ ४४९६/२०२२, दि.१८.०३.२०२२ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते. त्यानुसार शनिवार दि.२६.०३.२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.ना.श्री.आशुतोष अशोकराव काळे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.**

**१. मा.ना.श्री. आशुतोष अशोकराव काळे. अध्यक्ष**
**२. मा.ॲड. जगदीश हरिश्चंद्र सावंत, उपाध्यक्ष**
**३. मा. अनुराधा गोविंदराव आदिक, सदस्य**
**४. मा.ॲड. सुहास जनार्दन आहेर, सदस्य**
**५. मा.श्री. अविनाश अप्पासाहेब दंडवते, सदस्य**
**६. मा.श्री. सचिन रंगराव गुजर, सदस्य**
**७. मा.श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे, सदस्य**
**८. मा.श्री. जयवंतराव पुंडलिकराव जाधव, सदस्य**
**९. मा.श्री. महेंद्र गणपतराव शेळके, सदस्य**
**१०. मा.डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर, सदस्य**

**मा.श्रीमती भाग्यश्री बानायत, भा.प्र.से.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

समिती सदस्य मा.अनुराधा गोविंदराव आदिक सभेच्या सुरुवातीस ऑनलाईन उपस्थित होत्या, तदनंतर त्यांच्या इतर कार्यबाहुल्यामुळे पुढील कामकाजात त्यांनी भाग घेतला नाही. तसेच सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत समिती सदस्य मा.श्री.रराहूल नारायण कनाल यांनी दुरध्वनीव्दारे कळविले होते. याची समितीने नोंद घेऊन, त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

**यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.**

---

**विषय नं.०१** **दि.२४.०२.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.१५७** **दिनांक २४.०२.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

**(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)**

---

**विषय नं.०२** **संस्थानकडे देणगी रुपाने जमा झालेल्या सोने चांदीच्या वस्तु वितळविण्यापुर्वी मा.शासनाचे निर्देशानुसार अंमलबजावणी करणेबाबत.**

**निर्णय क्र.१५८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानकडे देणगी रुपाने जमा झालेल्या सोने चांदीच्या वस्तुपैकी ज्या वस्तु वितळविणे योग्य आहे अशा वस्तुंची छाननी करणेकामी समिती सदस्य मा.श्री.एकनाथ भागचंद गोंदकर, मा.श्री.सचिन रंगराव गुजर व मा.श्री.महेंद्र गणपत शेळके यांची नावे निश्चीत करण्यात आली.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.०३** श्री रामनवमी, श्री गुरुपोर्णीमा व श्री पुण्यतिथी उत्सवाच्या निमंत्रणपत्रिका, पाकीटे छपाईकामी प्राप्त ई-निविदेतील न्युनतम दराबाबत.

**निर्णय क्र.१५९** यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी, श्री गुरुपोर्णीमा व श्री पुण्यतिथी उत्सवाच्या निमंत्रणपत्रिका, पाकीटे छपाईकामी करण्यात आलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली. तसेच यापुढे निमंत्रणपत्रिका छपाई करतांना मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेबरोबर सर्व मा.विश्वस्त असा उल्लेख करण्यात यावा, असे निर्देश देण्यात आले.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

**विषय नं.०४** बाहययंत्रणेव्दारे ठेकेदारामार्फत श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात कार्यरत बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकारी यांचे वेतनाबाबत.

**निर्णय क्र.१६०** मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नमुद केले की, संस्थानचे रुग्णालयात बाहययंत्रणेव्दारे ठेकेदारामार्फत कार्यरत बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकारी यांना सध्या देण्यात येणारे वेतन हे कंत्राटी कुशल कर्मचा-यांचे वेतनापेक्षाही कमी आहे. त्यामुळे या वैद्यकीय अधिका-यांमध्ये असंतोष आहे. त्यांनी प्रतिमहा रु.३५,०००/-वेतन मिळणेबाबत विनंती अर्ज केलेला असून वेतनवाढ न मिळाल्यास काम सोडून जाण्याची तयारी दर्शविली आहे. संस्थान रुग्णालयामधील रुग्णसंख्या व डॉक्टरांची असलेली कमतरता तसेच सदर बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकारी यांची रुग्णांशी निगडीत अत्यावश्यक सेवा या बाबी विचारात घेऊन सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीपुढे सादर करण्यात आला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात बाहययंत्रणेव्दारे ठेकेदारामार्फत कार्यरत बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकारी यांना आठवडा सुट्टीसह प्रतिमहा रु.३५,०००/-वेतन आदा करणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.०५** १० लिटर क्षमतेचे ५५०० नग Oxygen Concentrator Machine खरेदी करणेचा प्रस्ताव रद्द करणेबाबत.

**निर्णय क्र.१६१** यावर सविस्तर चर्चा होऊन, १० लिटर क्षमतेचे ५५०० नग Oxygen Concentrator Machine खरेदी करणेचा प्रस्ताव रद्द करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.०६** शिर्डी येथे जम्बो कोविड सेंटर चालू करणेबाबत.

**निर्णय क्र.१६२** यावर सविस्तर चर्चा होऊन, सद्यस्थितीत रुग्णालयामध्ये भरती होणा-या कोरोना ग्रस्त रुग्णांचे प्रमाण अत्यल्प असल्याने शिर्डी येथे जम्बो कोविड सेंटर चालू करणेबाबतचा प्रस्ताव रद्द करण्यात आला.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.०७** श्री साईबाबा हॉस्पिटल मधील दैनंदिन वापराने खराब झालेले लिनन नष्ट करुन त्याचा साठा रजिष्टर मधून निर्लेखित करणेबाबत.

**निर्णय क्र.१६३** यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.१.१.२०२१ ते दि.३१.१२.२०२१ या कालावधीतील श्री साईबाबा हॉस्पिटल मधील लिनन दैनंदिन वापराने जीर्ण व खराब झाल्याने तसेच वापरण्यास निरुपयोगी असल्यामुळे ते विहीत पध्दतीने नष्ट करुन त्याचा साठा रजिष्टर मधून निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच यापुढे प्रस्तावामध्ये लिननच्या घसारा किंमतीचाही उल्लेख करण्यात यावा, असे निर्देश देण्यात आले.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.०८ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये जानेवारी-२०२२ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.६४,६२,९५४/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.१६४ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये जानेवारी-२०२२ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.६४,६२,९५४/-मात्रचे अवलोकन करुन त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.०९ श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरातील औषध दुकान पुढील ५ वर्षासाठी भाडेतत्वावर चालविणेस देणेबाबत.

निर्णय क्र.१६५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरातील औषध दुकान दि.०१.०७.२०२२ पासून पुढील पाच वर्ष कालावधीसाठी उच्चतम दराने व संस्थानने ठरवून दिलेल्या विक्री किंमतीने भाडेतत्वावर चालविण्यास देणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकरीता मान्यतेसाठी मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे प्रस्ताव पाठविण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.१० विविध प्रकारच्या पेपर पिशवी खरेदीसाठी पुरवठा आदेशाची मुदत संपुष्टात येत असल्याने पेपर पिशव्या २०२२-२३ करिताची ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सध्याचे पुरवठाधारकांकडून मंजूर दराने खरेदी करणेबाबत.

निर्णय क्र.१६६ यावर सविस्तर चर्चा होऊन, विविध प्रकारच्या पेपर पिशवी खरेदीसाठी पुरवठा आदेशाची मुदत संपुष्टात येत असल्याने दि.०१.०४.२०२२ ते दि.३०.०४.२०२२ या एक महिना कालावधीसाठी सध्याचे पुरवठाधारक मे.हरिओम फ्लेक्झीपॅक इंडस्ट्रीज, कोल्हापूर व मे.स्टार पॅकेजींग,दमण यांचेकडून मागील वर्षीच्या मंजूर दराने विविध प्रकारच्या पेपर पिशव्या गरजेप्रमाणे खरेदी करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- खरेदी विभाग)

---

विषय नं.११ गाईचे शुध्द तुप खरेदीसाठी पुरवठा आदेशाची मुदत संपुष्टात येत असल्याने २०२२-२३ करिताची ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सध्याचे पुरवठाधारकांकडून मंजूर दराने गाईचे शुध्द तूप खरेदी करणेबाबत.

निर्णय क्र.१६७ यावर सविस्तर चर्चा होऊन, गाईचे शुध्द तुप खरेदीसाठी पुरवठा आदेशाची मुदत संपुष्टात येत असल्याने दि.०१.०४.२०२२ ते दि.३०.०४.२०२२ या एक महिना कालावधीसाठी सध्याचे पुरवठाधारक रजवाडी डेअरी प्रॉडक्टस्, मेहसाना यांचेकडून मागील मंजूर दराने गरजेनुसार गाईचे शुध्द तूप खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- खरेदी विभाग)

---

विषय नं.१२ पेपर कप खरेदीसाठी पुरवठा आदेशाची मुदत संपुष्टात येत असल्याने २०२२-२३ करिताची ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सध्याचे पुरवठाधारकांकडून मंजूर दराने पेपर कप खरेदी करणेबाबत.

निर्णय क्र.१६८ यावर सविस्तर चर्चा होऊन, पेपर कप खरेदीसाठी पुरवठा आदेशाची मुदत संपुष्टात येत असल्याने दि.०१.०४.२०२२ पासून ते दि.३०.०४.२०२२ या एक महिना कालावधीसाठी सध्याचे पुरवठाधारक मे.बी.आर.आयएनसी, सोनीपत यांचेकडून मागील मंजूर दराने गरजेप्रमाणे पेपर कप खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- खरेदी विभाग)

---

विषय नं.१३ पॅकेज्ड ड्रीकींग वॉटर खरेदीसाठी पुरवठा आदेशाची मुदत संपुष्टात येत असल्याने वार्षिक मागणीच्या २५% पॅकेज्ड ड्रीकींग वॉटरची २०२२-२३ करीताची ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मागील पुरवठाधारकांकडून मंजूर दराने खरेदी करणेबाबत.

निर्णय क्र.१६९ यावर सविस्तर चर्चा होऊन, पॅकेज्ड ड्रीकींग वॉटर खरेदीसाठी पुरवठा आदेशाची मुदत संपुष्टात येत असल्याने दि.०१.०४.२०२२ पासून २०२२-२३ करीताची ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सध्याचे पुरवठादार मे.श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगाव व मे.साई अॅग्रो इंडस्ट्रीज, टाकळी यांचेकडून गरजेप्रमाणे १ लिटर व ५०० मिलीच्या पाणी बॉटल खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच यापुढे निविदेमध्ये मिनरल वॉटर असा उल्लेख करण्यात यावा, अशी सुचना देण्यात आली.

(कार्यवाही- खरेदी विभाग)

---

विषय नं.१४ संस्थानचे पाणी पुरवठा विभागासाठी ब्लिचींग पावडर, फेरीक अॅलम आणि क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदीकामी ई-निविदेत प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.

निर्णय क्र.१७० यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे पाणी पुरवठा विभागासाठी ब्लिचींग पावडर, फेरीक अॅलम आणि क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदेत प्रक्रियेतील खालील प्रमाणे निम्नतम निविदाधारक यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली.

मे.के.एस.एंटरप्रायजेस,औरंगाबाद

| अ.नं. | तपशील | परिमाण | दर |
|---|---|---|---|
| १ | ब्लिचींग पावडर - (विक्रम ब्रॅन्ड, ग्रासीम मेक, आय.एस.आय. मार्क, ३४% क्लोरीन उपलब्ध) | 35.00 मे. टन | 24450.00 |

मे.यश केमिकल्स, नाशिक

| अ.नं. | तपशील | परिमाण | दर |
|---|---|---|---|
| १ | फेरीक अॅलम - (१६% अॅलोमिना फेरीक उपलब्ध) | 55.00 मे. टन | 8900.00 |

मे.जी.एस.कमर्शिअल कार्पोरेशन, मुंबई

| अ.नं. | तपशील | परिमाण | दर |
|---|---|---|---|
| १ | क्लोरीन गॅस सिलेंडर (१ सिलेंडर = १०० किलो वजन) | 50.00 सिलेंडर | 5750.00 |

(कार्यवाही- खरेदी विभाग)

---

विषय नं.१५ संस्थानचे आरोग्य विभागासाठी स्वच्छता साहित्य खरेदीकामी ई-निविदेत प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.

निर्णय क्र.१७१ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे आरोग्य विभागासाठी स्वच्छता साहित्य खरेदीकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदेत प्रक्रियेतील खालील प्रमाणे निम्नतम निविदाधारक यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली.

मे.हितु जीतू एंटरप्रायजेस, मुंबई

| Sr. No. | Description of Work / Item(s) | No.of Qty | Unit | Rate Per Unit Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | लिक्वीड सोप -घटक प्रती लिटर अॅसीड स्लरी (८०% ) १०० ग्रॅम कॉस्टीक सोडा(४०%कॉस्टीक लाय द्रावण) २० ग्रॅम-कोणत्याही रंगाचे | 3000 | लिटर | 24.00 |
| 2 | वॉश बेशीन/टॉयलेट क्लिनर (Toilet cleaners)-Harpic/ Tanaz/ Dr.Ideal/Super Shine/Any Other Company-०५ लिटरचे पॅकींग- वॉश बेसीन/संडास भांडयाचे डाग काढणेकामी | 1000 | लिटर | 56.00 |
| 3 | सेन्टेड डांबर गोळी- चांगल्या प्रतीच्या- ०१ किलो पॅकिंग | 100 | किलो | 150.00 |

मे.रोहीत एजन्सी, नासिक

| Sr. No. | Description of Work / Item(s) | No. of Qty | Unit | Rate Per Unit Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | रबरी वायफर स्टील दांडयासहीत- २”-३” रुंदी व १८“ लांब,दांडे ५ फुट लांबीचे- चांगल्या प्रतीचे लवचिक रबर असलेले | 200 | नग | 195.00 |
| 2 | नायलॉन ब्रश- लांबदांडीचे फायबर दांडा असलेले (टॉयलेट साफ करणे कामी)- स्टँडर्ड -चांगल्या प्रतीचे | 100 | नग | 55.70 |
| 3 | नायलॉन ब्रश- लहान- लाकडी मुठीचे (डाग घासणे कामी) - स्टँडर्ड -चांगल्या प्रतीचे | 100 | नग | 34.81 |

मे. साईकेम एंटरप्रायजेस, रामपूर

| Sr.No. | Description of Work / Item(s) | No.of Qty | Unit | Rate Per Unit Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | कुंचे -प्रत्येकी ५०० ग्रॅम वजनाचे, स्पेशल लांब काड्याचे, खुंटी नसलेले, मजबूत बांधणीचे - चांगल्या प्रतीचे | 3000 | नग | 79.00 |
| 2 | ब्लिचिंग पावडर -आयएसआय मार्क - २५ किलोची बॅग | 1000 | किलो | 24.00 |
| 3 | लिक्वीड-(फरशीवरील सर्व प्रकारचे डाग काढणेकामी)- Taski / Ecolab / Schevron Any Other Company-०५ लिटरचे पॅकींग | 300 | लिटर | 59.00 |

मे. घराणा प्रोडक्टस, मुंबई

| Sr. No. | Description of Work / Item(s) | No. of Qty | Unit | Rate Per Unit Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | डस्टपॅन (कचरा गोळा करणेकामी)- स्टँडर्ड साईज, दोन फुट लांब दांडी, झाकण असलेले- चांगल्या प्रतीचे फायबर | 100 | नग | 500.00 |
| 2 | चोक रिमुव्हर -फायबर दांड्यासहित- स्टँडर्ड -चांगल्या प्रतीचे | 100 | नग | 45.00 |
| 3 | सेंटेड फिनेल -पाण्याशी डायल्यूशन रेशो १:१०० कोरे (प्युअर)- घटक प्रती लिटर -पाईन ऑईल A ग्रेड ६५० ग्रॅम टर्कीड ऑईल (TRO ७५%) ३५० ग्रॅम | 3000 | लिटर | 48.00 |
| 4 | बी.एच.सी. पर्यायी पावडर/फॉलीडॉल पावडर- Fenvalrate–0.4%आय.एस.आय.मार्क-२५ किलोची बॅग | 2000 | किलो | 10.00 |
| 5 | किटकनाशकऔषध-BAYERकंपनी-Temprid–SC,ISI mark-किटकनाशक फवारणी कामी-500 ml. लिटरचे पॅकींग. | 25 | लिटर | 3500.00 |
| 6 | All purpose cleaners तेलकट डाग काढणेसाठी-Taski / Ecolab / Schevron Any Other Company-०५ लिटर पॅकींग | 300 | लिटर | 110.00 |
| 7 | लिक्वीड पॉलिश- ब्रासो/धारा/पितांबरी किंवा इतर कंपनीचे- पितळी अक्षरे साफ करणे कामी- २०० ml. पॅकींग असलेले- चांगल्या प्रतीचे | 5 | लिटर | 75.00 |

तसेच खराटेंसाठी प्राप्त तीन नमुन्यांपैकी केवळ मे. रोहीत एजन्सी, नासिक यांचा नमुना हा इंडोनेशिया ब्रुम- स्टँडर्ड या मागणीप्रमाणे प्राप्त झालेला आहे तथापी त्यांनी ई-निविदेत दिलेला दर

उच्चतम असल्याने व उर्वरित दोन निविदाधारक मे.साईकेम एंटरप्रायजेस, रामपूर व मे. घराना प्रॉडक्टस (संतोष हेगडे), मुंबई यांनी दिलेले खराटे नमुने हे इंडोनेशिया ब्रुमर या मागणीप्रमाणे नसल्याचे तर रबरी काळ्या रंगाच्या मॅटसाठी मे. घराना प्रॉडक्टस,मुंबई या एकाच निविदाकाराचे दर प्राप्त झाल्याने सुधारित खरेदी नियमावलीतील ४.४.३.१ (क) तरतुदीनुसार खराटे व काळया रंगाचे रबरी मॅट पुर्ननिविदा म्हणजेच दरपत्रके मागविणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- खरेदी विभाग)

---

विषय नं.१६ भाजीपाला खरेदीसाठी पुरवठा आदेशाची मुदत संपुष्टात येत असल्याने जानेवारी-२०२२ ते मार्च-२०२२ या क्वार्टरच्या पुरवठा आदेशाच्या एकुण परिमाणाच्या २५% भाजीपाला २०२२-२३ करीता मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय होऊन निर्णयाप्रमाणे कार्यवाही होईपर्यंत भाजीपाला खरेदी करणेबाबत.

निर्णय क्र.१७२ यावर सविस्तर चर्चा होऊन, भाजीपाला खरेदीसाठी पुरवठा आदेशाची मुदत संपुष्टात येत असल्याने २०२२-२३ करीता भाजीपाला खरेदीकामी मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय होऊन निर्णयाप्रमाणे कार्यवाही होईपावेतो जानेवारी-२०२२ ते मार्च-२०२२ या क्वार्टरमधील आयटेमवाईज मागील मंजूर दराने गरजेप्रमाणे भाजीपाला खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच सध्याचे पुरवठाधारकांपैकी कोणी ऐनवेळी भाजीपाला पुरवठा करण्याचे नाकारल्यास तो भाजीपाला कृषी उत्पन्न बाजार समिती, राहाता येथुन पुर्वीचे पध्दतीने लिलावाव्दारे खरेदी करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-खरेदी विभाग)

---

विषय नं.१७ श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये चपाती मशिनव्दारे चपाती तयार करणेकामी प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होऊन पुरवठा आदेश देणेबाबत.

निर्णय क्र.१७३ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये चपाती मशिनव्दारे चपाती तयार करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.ओम एंटरप्राईजेस, पुणे यांचे प्रति क्विंटल कोरडा गहु आटा+मैदा आटा करीता रक्कम रु.२४३+GST हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.
(कार्यवाही-श्री साई प्रसादालय)

---

विषय नं.१८ श्री साई प्रसादालयामार्फत मनुष्यबळाव्दारे अन्नपाकिटे (नाष्टापाकिटे) तयार करणेकामी प्राप्त न्यूनतम दराबाबत निर्णय होऊन कार्यादेश देणेबाबत.

निर्णय क्र.१७४ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयामार्फत मनुष्यबळाव्दारे अन्नपाकिटे (नाष्टापाकिटे) तयार करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.यशोधरा महिला सह. औद्योगिक उत्पा. संस्था, नाशिक यांचे प्रति अन्नपाकीटास GST विरहीत रक्कम रु.२.१५ मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.
(कार्यवाही- श्री साई प्रसादालय)

---

विषय नं.१९ श्री साई प्रसादालयातील प्रसाद भोजनामध्ये स्वामी नारायण पोळी (चपात्या)/पुरी मनुष्यबळाव्दारे तयार करणेकामी प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होऊन कार्यादेश देणेबाबत.

निर्णय क्र.१७५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील प्रसाद भोजनामध्ये स्वामी नारायण पोळी (चपात्या)/पुरी मनुष्यबळाव्दारे तयार करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.नित्यर्थ फॅसिलिटी मॅनेजमेंट सर्व्हिसेस, नाशिक यांचे प्रति क्विंटल कोरडा गहु आटा+मैदा आटा करीता GST विरहीत रक्कम रु.१६७९/-मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- श्री साई प्रसादालय)

---

| | |
|---|---|
| विषय नं.२० | संस्थान निधीतून शिर्डी नगरपंचायत हद्दीतील प्रथम प्राधान्य गटातील एकुण ११ रस्त्यांच्या भूसंपादन प्रकरणांपैकी एलएक्यु/एसआर/०४/२००७, एलएक्यु/एसआर/०७/२००७ तसेच शिर्डी विकास योजना पालखी रस्ता ९.० मी.रुंदीकरण संबंधीत भूसंपादन एलएक्यु/एसआर/२१/२००३ या भूसंदर्भ दाव्यात मा.दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, राहाता यांचे न्यायनिर्णयाचे आधारे परिगणीत केलेल्या वाढीव नुकसान भरपाईची रक्कम संबधीतांना अदा करणेकामी भूसंदर्भ दावे नगरपंचायत, शिर्डी यांचेकरवी मा.दिवाणी न्यायालयाच्या लोकअदालत मध्ये ठेवून तडजोड करणेबाबत. |
| निर्णय क्र.१७६ | यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी वाढीव नुकसान भरपाईची रक्कम संस्थानमार्फत अदा करणेबाबत मान्यतेसाठी महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा व सदर प्रस्तावामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.व्यवस्थापन समितीला धोरणात्मक निर्णय घेण्यास प्रतिबंध केलेला आहे. याचाही उल्लेख करावा. शासनाकडून मान्यता येईपर्यंत थांबणे आवश्यक असल्याने याबाबत चर्चा करणेसाठी संबधीतांना तसेच मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना मा.व्यवस्थापन समितीपुढे बोलविण्यात यावे, असे ठरले. |

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

| | |
|---|---|
| विषय नं.२१ | श्री संजय रामराव शेळके, श्री.विलास रंगनाथ शेळके व इतर यांचे मालकीची मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२४ मधील संस्थानने खरेदी घेतलेल्या जमीनीवरील आरक्षण क्र.३८ (क्रिडांगण) रद्द करणेबाबत. |
| निर्णय क्र.१७७ | यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर १२४ पैकीची संस्थानने खरेदी घेतलेल्या जमीनीवर आरक्षण क्रं.३८ (क्रिडांगण) हे असल्याने सदर जमीनीचा वापर संस्थानला इतर प्रयोजनासाठी करता येत नाही. तसेच संस्थान मालकीचे मौजे निमगांव-को-हाळे येथील ग.नं.१८३ मध्ये शैक्षणिक संकुलाचे बांधकाम चालू असल्याने संस्थानला शाळेची व क्रिडांगणाची आवश्यकता नाही. यास्तव मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२४ मधील आरक्षण क्रं.३८ (क्रिडांगण) रद्द करुन त्याऐवजी भक्तांचे सुविधांसाठी व विविध उपक्रमांसाठी सदर जमीनीचा वापर करता येईल, असे मुख्याधिकारी, शिर्डी नगरपरिषद, शिर्डी यांना कळविणेस मान्यता देण्यात आली. |

(कार्यवाही- मालमत्ता विभाग)

---

| | |
|---|---|
| विषय नं.२२ | लाडू प्रसाद तयार करणेची स्पर्धा आयोजित करणेसाठी संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत. |
| निर्णय क्र.१७८ | यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागामध्ये लाडू प्रसाद तयार करणेची स्पर्धा आयोजित करणेकामी प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली. |

(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

---

| | |
|---|---|
| विषय नं.२३ | सन २०२२-२३ करीता मोतीचुर लाडु, सुटी बुंदी (आवश्यकता भासल्यास) व बर्फी प्रसाद तयार करुन पॅकींग करुन देणे आदि कामांसाठी ई-निविदेत प्राप्त झालेल्या (L1) न्यूनतम दरांबाबत. |
| निर्णय क्र.१७९ | यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२२-२३ करीता मोतीचुर लाडु, सुटी बुंदी (आवश्यकता भासल्यास) व बर्फी प्रसाद तयार करुन पॅकींग करुन देणे इत्यादी कामांसाठी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.नित्यर्थ फॅसिलिटी मॅनेजमेंट सर्व्हिसेस, नाशिक यांचे खालील प्रमाणे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली. |

मे.नित्यर्थ फॅसिलिटी मॅनेजमेंट सर्व्हिसेस, नाशिक

| अ.नं | तपशील | दर |
|---|---|---|
| १ | गावरान तुपातील मोतीचुर बुंदीचे प्रसाद लाडू तयार करुन सुकविणे, पॅकिंग करणे इ. चा दर प्रती १००० नग लाडुस (५० ग्रॅम वजनाचे ०३ नगाचे पाकीट हाताने पॅकींग करणे) | २८१.२० |
| २ | गावरान तुपातील मोतीचुर बुंदीचे प्रसाद लाडू तयार करुन सुकविणे, पॅकिंग करणे इ. चा दर प्रती १००० नग लाडुस (५० ग्रॅम वजनाचे ०३ नगाचे पाकीट मशिनने पॅकींग करणे) | २८३/- |
| ३ | गावरान तुपातील मोतीचुर बुंदीचे प्रसाद लाडू तयार करुन सुकविणे, पॅकिंग करणे इ. चा दर प्रती १००० नग लाडुस (५० ग्रॅम वजनाचे ०१ नगाचे पाकीट हाताने पॅकींग करणे) | २९८/- |
| ४ | गावरान तुपातील मोतीचुर बुंदीचे प्रसाद लाडू तयार करुन सुकविणे, पॅकिंग करणे इ. चा दर प्रती १००० नग लाडुस (५० ग्रॅम वजनाचे ०१ नगाचे पाकीट मशिनने पॅकींग करणे) | २९१/- |
| ५ | गावरान तुपातील सुट्टी बुंदी प्रसाद तयार करुन सुकविणे, पॅकिंग करणे इ. चा दर प्रती १००० नग पाकीटांस (अंदाजे ५० ग्रॅम वजनाचे एक पाकीट हाताने पॅकींग करणे) | २९६/- |
| ६ | गावरान तुपातील सुट्टी बुंदी प्रसाद तयार करुन सुकविणे, पॅकिंग करणे इ. चा दर प्रती १००० नग पाकीटांस (अंदाजे ५० ग्रॅम वजनाचे एक पाकीट मशिनने पॅकींग करणे) | २९७/- |
| ७ | वनस्पती तुपातील रवा, खोबरा बर्फी तयार करणे (०१ क्विंटल साखरेसाठी) | २९६/- |

(कार्यवाही- लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

---

**विषय नं.२४** श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विविध व्यवसायांचे जुने कालबाहय झालेले साहित्य बदलून त्याजागी नविन साहित्य (Tools/Equipment ect.) खरेदीबाबत.

**निर्णय क्र.१८०** यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विविध व्यवसायांचे जुने कालबाहय झालेले साहित्य बदलून त्याजागी नविन साहित्य (Tools/Equipment ect.) विहीत पध्दतीने खरेदी प्रक्रिया राबवून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१,०५,९२,८०८/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. याकामी ई-निविदा मागविणेसाठी देण्यात येणारी जाहिरात मराठी वृत्तपत्रामध्येही देण्यात यावी, अशी सुचना यावेळी देण्यात आली.

(कार्यवाही-श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था)

---

**विषय नं.२५** संस्थानचे वाहनांसाठी तसेच इतर विभागांना लागणारे इंधन खरेदीकामी स्थानिक पुरवठादारांकडून दरपत्रके मागविणे बाबत.

**निर्णय क्र.१८१** यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानची वाहने, विद्युत जनित्रे, लॉण्ड्री, फॉगिंग मशिन व इतर कामाकरीता लागणारे इंधन डिझेल व पेट्रोल खरेदी कामी स्पर्धात्मक दर प्राप्त होणेसाठी शिर्डी व परिसरातील पेट्रोल पंप धारकांकडून इंधन बिलास एक महिना क्रेडीट सह प्रती लिटर सुटीचे दरपत्रके मागविणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वाहन विभाग)

---

**विषय नं.२६** **साठा संपुष्टात येत असलेल्या संस्थान प्रकाशित २१ प्रकाशने (पुस्तके) पुर्न:मुद्रण करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबवून छपाई करुन घेणेस आणि त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१८२** **मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे नमुद केले की, सदरचा विषय हा धोरणात्मक स्वरुपाचा वाटत असला तरी उपरोक्त प्रस्तावात नमुद पुस्तकांची साईभक्तांकडून मागणी होत असते त्यामुळे सदर विषय हा साईभक्तांचे सोई-सुविधेशी निगडीत असल्याने या संदर्भात निर्णय घेणेकामी मा.व्यवस्थापन समितीपुढे सादर करण्यात आलेला आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे साठा संपुष्टात येत असलेल्या संस्थान प्रकाशित २१ प्रकाशने (पुस्तके) पुर्न:मुद्रण करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबवून छपाई करुन घेण्यास व त्याकामी येणा-या अंदाजीत रक्कम रु.३,११,५५,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच कार्यादेश देण्यात येऊन आवश्यकतेनुसारच छपाई करुन घेण्यात यावी, असे निर्देश देण्यात आले.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.२७** **साईआश्रम भक्तनिवास येथील A, B व C इमारतीचे ए.सी.यंत्रणेचे सन २०२२-२३ वर्षाकरीता मे.डायकीन एअर कंडीशनींग इंडीया प्रा.लि.,पुणे यांना वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट (AMC) देणेसाठी मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास येथील A, B व C इमारतीचे ए.सी. यंत्रणेचे दि.०१.०४.२०२२ ते दि.३१.०३.२०२३ या एक वर्ष कालावधीसाठी उत्पादक कंपनी मे.डायकीन एअर कंडीशनींग इंडीया प्रा.लि.,पुणे यांना वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) कार्यादेश देण्यास व याकामी येणा-या रक्कम रु.६,१०,५००/-+कर या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.२८** **मोफत दर्शन पास (Time Base) कार्यप्रणाली अंतर्गत संगणके व संगणकीय साहित्य खरेदी करणेकामी राबविणेत येत असलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत प्राप्त झालेल्या निम्नतम दरांबाबत.**

**निर्णय क्र.१८४** **सदरचा प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात आला.**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.२९** **मंदिर परिसर, साई धर्मशाळा, श्री साई प्रसादालय, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय, कनकुरी साठवण तलाव या इमारतीवरती व परिसरातील स्ट्रीट लाईट करीता एल.ई.डी.स्ट्रीट लाईट फिटींग खरेदी करुन बसविणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.४४,४२,५८२/- इतक्या खर्चास तसेच विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१८५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसर, साई धर्मशाळा, श्री साई प्रसादालय, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय, कनकुरी साठवण तलाव या इमारतीवरती व परिसरातील स्ट्रीट लाईट करीता एल.ई.डी.स्ट्रीट लाईट फिटींग खरेदी करुन बसविणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.४४,४२,५८२/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी ई-निविदा मागविणेसाठी देण्यात येणारी जाहिरात मराठी वृत्तपत्रामध्येही देण्यात यावी, अशी सुचना देण्यात आली.**

**(कार्यवाही-विद्युत विभाग)**

---

विषय नं.३० सन २०२२-२३ करीता साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग, स्वच्छता इ.दुरुस्ती व देखभालीची कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेबाबत.

निर्णय क्र.१८६ यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२२-२३ करीता साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग, स्वच्छता इ.दुरुस्ती व देखभालीची कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक सुमित फॅसिलीटीज् लि., पुणे यांचे GST सह वार्षिक एकुण रक्कम रु.११,३१,९४,३४६.१६मात्र स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-साईआश्रम भक्तनिवास)

---

विषय नं.३१ सन २०२२-२३ या कालावधीसाठी साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग विद्युत प्लबींग, स्वच्छता इ.दुरुस्ती व देखभालीचे कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेबाबत.

निर्णय क्र.१८७ यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२२-२३ या कालावधीसाठी साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग विद्युत प्लबींग, स्वच्छता इ.दुरुस्ती व देखभालीचे कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक सुमित फॅसिलीटीज् लि., पुणे यांचे GST सह वार्षिक एकुण रक्कम रु.५,०८,१७,२८०.५६मात्र स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-साई धर्मशाळा)

---

विषय नं.३२ साई आश्रम भक्तनिवास इमारतीचे अंतर्गत रंगकाम व दुरुस्ती करणे कामाचे ठेकेदार ॲडमायरकॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.मुंबई यांचे सहावे व अंतिम बिलानूसार झालेल्या कामाचे एकूण रक्कम (Final Value of Workdone) रु.४,७०,२४,१७४/- मात्र मंजूर होणेस व त्यापैकी उर्वरीत शिल्लक देय रक्कम रु.६३,७१,६९३/- मात्र आदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.१८८ यावर सविस्तर चर्चा होऊन, साई आश्रम भक्तनिवास इमारतीचे अंतर्गत रंगकाम व दुरुस्ती करणे कामाचे ठेकेदार ॲडमायरकॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.मुंबई यांचे सहावे व अंतिम बिलानूसार झालेल्या कामाचे (Final Value of Work done) एकूण रक्कम रु.४,७०,२४,१७४/- मात्र मंजूर करण्यात येऊन त्यामधुन यापुर्वी आदा करणेत आलेली रक्कम वजा जाता उर्वरीत शिल्लक देय रक्कम रु.६३,७१,६९३/- मात्र आदा करणेस मान्यता देण्यात आली. तसेच विलंबापोटी (Liquidated Damages) कपात केलेली रक्कम रु.४,७७,०००/-मात्र त्यांना परत करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

विषय नं.३३ साई धर्मशाळा परिसरातील सर्व इमारतींचे आतील व बाहेरील बाजूने रंगकाम करणे व इमारतीचे संडास, बाथरुमचे नुतनीकरण करणे कामासाठी येणारे अपेक्षित रु.१३,४४,७६,६०१/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देणेबाबत.

निर्णय क्र.१८९ सदरचा प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात आला. उपसमिती सभेचे दिवशी मा.सदस्यांनी याबाबत पाहणी करावी व त्यानंतर सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीपुढे ठेवण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

विषय नं.३४ मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१४८ पै.मधील जागेत संस्थानचे अग्निशमन वाहन पार्किंगकरीता पत्राशेड उभारणी करणे कामाचे ठेकेदार कासम इलियास कच्छी, मनमाड यांची अनामत रक्कम जप्त करणेस व याकामासाठी येणा-या रक्कम रु.१५,८१,५७९/-मात्रचे खर्चास तसेच नव्याने ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.१९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१४८ पै.मधील जागेत संस्थानचे अग्निशमन वाहन पार्किंगकरीता पत्राशेड उभारणी करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक ठेकेदार कासम इलियास कच्छी, मनमाड यांची अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन याकामासाठी नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी सुधारीत अंदाजपत्रकानुसार येणा-या रक्कम रु.१५,८१,५७९/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.३५** **संस्थानमार्फत श्री रामनवमी उत्सव सन-२०२२ तसेच उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणेसाठी ठेकेदार कैलास मंडप व लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर यांचे निम्नतम दराबाबत.**

**निर्णय क्र.१९१** **संस्थानमार्फत श्री रामनवमी उत्सव सन-२०२२ तसेच उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणेसाठी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.कैलास मंडप ॲन्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर यांचे प्रतिनिधी श्री.मिलींद कानडे हे सभेसमोर उपस्थित होते. त्यांनी सभेस सांगीतले की आमचे मालक श्री.पंडीतराव खरपुडे हे आजारी असुन त्यांना रुग्णालयात दाखल केलेले आहे. त्यामुळे ई-निविदेप्रमाणे सर्व मंडप ते करु शकणार नाहीत. फक्त काही ठरावीक मंडपाचे काम करण्यास ते तयार आहेत. अशा प्रकारे ई-निविदेतील एकुण कामाच्या सुमारे २५ टक्के काम करण्याची तयारी दर्शविल्यामुळे निविदेतील अटी शर्तींचा भंग होत आहे. त्यामुळे सदर निविदाधारक यांची बयाणा रक्कम जप्त करुन त्यांचे नावाचा पुढील तीन वर्ष कालावधीसाठी काळया यादी समावेश करण्यात यावा, असे ठरले.**

**तसेच यापुर्वीची ई-निविदा प्रक्रिया रद्द करुन श्री रामनवमी उत्सवाकरीता संस्थान परिसरात उभारावयाचे मंडप, उन्हाळी मंडप व निवासव्यवस्था इत्यादी मंडप उभारणीसाठी तत्काळ कमी कालावधीची ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी. निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सध्या मंदिर परिसरात उभे असलेल्या मंडपांना पुर्वीचेच मंजुर दराने मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**तसेच मुंबई ते शिर्डी मार्गावरील पालखी पदयात्रीचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था इच्छुक देणगीदार साईभक्तांमार्फत देणगी दाखल करुन घेण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.३६** **श्री साईबाबा समाधी मंदिराचे दक्षिण बाजूकडील खिडक्यांना बुलेटप्रुफ काचा बसविणेसाठी मेट्रो ग्लास हाऊस, कळंबोली, मुंबई यांचे निम्नतम दराबाबत.**

**निर्णय क्र.१९२** **श्री साईबाबा समाधी मंदिराचे दक्षिण बाजूकडील खिडक्यांना बुलेटप्रुफ काचा बसविणेसाठी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मेट्रो ग्लास हाऊस, कळंबोली, मुंबई हे आजचे सभेपुढे चर्चेसाठी उपस्थित होते. समितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी ई-निविदेतील नमुद रक्कम रु.२०,४७,५००/- यामध्ये रु.२५,०००/- कमी करणेस मान्यता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मेट्रो ग्लास हाऊस, कळंबोली, मुंबई यांनी चर्चेअंती देऊ केलेले रक्कम रु.२०,२२,५००/-मात्र अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.३७** **संस्थानचे प्रशासकीय कार्यालयाच्या शांतिनिवास इमारतीस लिफ्ट बसविणेकामी लिफ्ट शाफ्टचे बांधकाम करणे कामाचे ठेकेदार सनराईज कन्स्ट्रक्शन, नाशिक यांनी सादर केलेल्या दुस-या व अंतिम बिलाची रक्कम रु.९,८१,७१२/-मात्र मंजूर होऊन त्यापैकी उर्वरीत देय रक्कम रु.१,९३,६०२/-मात्र आदा करणेस मंजूरी देणे.**

निर्णय क्र.१९३ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे प्रशासकीय कार्यालयाच्या शांतिनिवास इमारतीस लिफ्ट बसविणेकामी लिफ्ट शाफ्टचे बांधकाम करणे कामाचे ठेकेदार सनराईज कन्स्ट्रक्शन, नाशिक यांनी सादर केलेल्या दुस-या व अंतिम बिलाची रक्कम रु.९,८१,७१२/-मात्र मंजूर करण्यात येऊन त्यापैकी उर्वरीत देय रक्कम रु.१,९३,६०२/-मात्र त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

विषय नं.३८ संस्थानच्या वतीने गोशाळा सुरु करणेबाबत.

निर्णय क्र.१९४ सदरचा प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात आला. (कार्यवाही-बगीचा विभाग)

---

विषय नं.३९ साई मंदिर सुरक्षेकरीता महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ ऐवजी महाराष्ट्र राज्य पोलीस विभागामार्फत सुरक्षा घेणेबाबत.

निर्णय क्र.१९५ यावर सविस्तर चर्चा होऊन, CISF/CRPF सुरक्षा ही व्यावसाईक एंजन्सी आहे. संस्थानमध्ये येणारा व्यक्ती हा भाविक असल्याने त्यांचे बरोबर नम्रतेने व्यवहार करावा लागेल अन्यथा वादाचे प्रंसग उद्‌भवतील. या सुरक्षा एजन्सी साईभक्तांची चेकींग फ्रिस्किंग करतील व त्यासाठी जास्त वेळ लागेल तसेच सुट्टीच्या दिवशी, उत्सवाच्या दिवशी प्रचंड गर्दी होत असल्याने वेळेत चेकींग फ्रिस्किंग पुर्ण न केल्यास भक्तांचे दर्शन वेळेत होणार नाही त्यामुळे भाविकांची गर्दी नियंत्रीत करणे शक्य होणार नाही. सर्व धार्मिक स्थळांच्या सुरक्षा व्यवस्थेबाबत माहिती घेतली असता सद्यस्थितीत देशातील सर्वात मोठे तिरूपती देवस्थान येथेही त्यांचे स्वत:चे सुरक्षा रक्षकांमार्फत सुरक्षेचे काम केले जात आहे तसेच सिध्दी विनायक देवस्थान मुंबई,विठ्ठल रूख्मिणी मंदिर देवस्थान पंढरपुर,महालक्ष्मी देवस्थान कोल्हापूर,तुळजा भवानी देवस्थान,तुळजापुर येथेही सुरक्षेचे काम मंदिराच्या सुरक्षा विभागामार्फत केले जाते. अद्याप सदर देवस्थानांनी CISF/CRPFची सुरक्षा व्यवस्था घेतलेली नाही. या सर्व बाबी विचारात घेऊन संस्थानचे स्वत:चे सुरक्षा रक्षकांमार्फत सुरक्षेचे काम करुन घेण्यात यावे, व त्यानुसार मा.न्यायालयात संस्थानचे म्हणणे सादर करण्यात यावे, असे ठरले.

(कार्यवाही-संरक्षण विभाग)

---

विषय नं.४० श्री साईबाबा संस्थान शिर्डी, संयुक्त पाणी पुरवठा योजना टप्पा क्र.१ (संस्थान अंतर्गत) कामांकरीता मुदतवाढ व भाववाढ मिळणेसाठी ठेकेदार यांनी केलेल्या मागणीबाबत.

निर्णय क्र.१९६ श्री. विवेक रोटे, कार्यकारी अभियंता, म.जि.प्र., संगमनेर व श्री.शेखर मेतकरी, उप अभियंता,म.जी.प्र. उपविभाग, कोपरगांव हे सभेपुढे उपस्थित होते. त्यांनी सभेस सांगीतले की, टप्पा क्र.१ व २ साठी योजना तयार करणे व तांत्रिक मान्यता देणे यासाठी मागणी केलेली फी ची एकुण रक्कम रु.३.९० कोटी संस्थानकडून आदा करुन त्यावरचा करारनामा केल्याशिवाय ठेकेदार यांची बिले प्रमाणीत करणे, तसेच प्रकल्पाबाबत इतर तांत्रिक सल्लासेवा म.जि.प्र.यांचेकडून देता येणार नाही. यावर निर्णय घेण्याचा अधिकारी मा.सदस्य सचिव, म.जि.प्रा.यांना आहे.

तसेच सदर कामाचे ठेकेदार द इंडियन हयुम पाईप, पुणे यांचे प्रतिनीधी श्री.सरदार शेख, असि.जनरल मॅनेजर हे सभेपुढे उपस्थित होते. त्यांनी सदर कामासाठी मुदतवाढ, दरवाढ व आयडल चार्जेस तसेच प्रलंबीत बिले मिळणेबाबत विनंती केली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.अध्यक्ष महोदय व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणी मा.पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री महोदय यांचे दालनात मा.सदस्य सचिव, म.जि.प्रा. यांचे समवेत बैठक आयोजित करुन फक्त टप्पा क्र.१ चे कामाबाबत म.जि.प्रा. यांनी करारनामा करुन सल्ला व सेवा पुरविणेबाबत महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय दि.४/६/२०१८ नुसार सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क म्हणून ३ टक्के इतके शुल्क आकारणेबाबत चर्चा करुन निर्णय घ्यावा, असे ठरले. (कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग)

---

**विषय नं.४१** **सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात निरुपयोगी भंगार साहित्य विक्रीकामी प्राप्त ई-निविदेतील उच्चतम दरासंदर्भात निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.१९७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात निरुपयोगी भंगार साहित्य विक्रीकामी राबविणेत आलेल्या ई-निविदेतील प्राप्त उच्चतम दराने निरुपयोगी भंगार साहित्याची विक्री करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच श्रींचे समाधी मंदिरातील निघणारे फुल व हार निर्माल्य विक्रीकरीता उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही-अभिलेख कक्ष/बगीचा विभाग)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यता आली.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१** **श्री रामनवमी उत्सव-२०२२ आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी कलाकार व मानधन निश्चित करणेबाबत.**

**निर्णय क्र.१९८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सव-२०२२ मध्ये आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी विनामुल्य सेवा देणा-या कलाकारांना प्राधान्य देण्यात यावे. तसेच यापैकी कोणी अनुपस्थित असल्यास उपरोक्त प्रस्तावातील १ ते ५ पैकी कलाकारांचे कार्यक्रम आयोजित करण्यात यावे. तसेच समिती सदस्य मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांनी सुचविलेल्या कलाकारांचेही कार्यक्रम आयोजित करण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०२** **सन २०२२-२३ वर्षाकरीता प्रसादालयासाठी वार्षिक भाजीपाला खरेदी नियमावली.**

**निर्णय क्र.१९९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२२-२३ वर्षाकरीता संस्थानचे श्री साई प्रसादालयासाठी लागणारा वार्षिक भाजीपाला ई-निविदा पध्दतीने खरेदी करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०३** **संस्थानचे विविध इमारती/स्थळांचे छतावर अपारंपारिक ऊर्जेअंतर्गत रुफ टॉप सोलर पी.व्ही.सिस्टीम प्रकल्प उभारणेसाठी कन्सल्टंट नेमणेबाबत.**

**निर्णय क्र.२००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे विविध इमारती/स्थळांचे छतावर अपारंपारिक ऊर्जेअंतर्गत रुफ टॉप सोलर पी.व्ही.सिस्टीम प्रकल्प उभारणेकरीता महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) यांचे अधिकृत पॅनलवरील तेरा कन्सल्टंटपैकी एका कन्सल्टंटची निवड करणेकामी त्यांचेशी पत्रव्यवहार करुन त्यांचेकडून सदर कामांसाठी निविदा/दरपत्रके मागविणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-विद्युत विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०४** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये फेब्रुवारी-२०२२ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.५९,२०,०३५/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२०१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये फेब्रुवारी-२०२२ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.५९,२०,०३५/-मात्रचे अवलोकन करुन त्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०५ सन २०२२-२३ करीता साई आश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर धुणे व इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, चादर (ब्लँकेट) धुणे, सोलापुर चादर व गादीच्या खोळी धुणेकामी निम्नतम दरधारकास लॉन्ड्री कामाच्या कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.२०२ यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२२-२३ करीता साई आश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर धुणे व इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, चादर (ब्लँकेट) धुणे, सोलापुर चादर व गादीच्या खोळी धुणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक साईशुभम लॉन्ड्री, सावळीविहीर यांचे खालील प्रमाणे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.

साईशुभम लॉण्ड्री, सावळीविहीर

| अ.नं | कपडयांचा तपशील | प्रती नग दर रु. (सर्वकरासह) |
|---|---|---|
| १ | बेडशीट धुवून इस्त्री करणे | ३.६० |
| २ | उशी कव्हर धुवून इस्त्री करणे | १.७५ |
| ३ | टॉवेल धुवून ड्रायर करणे | ४.०० |
| ४ | सोलापूर चादर धुणे | ८.२६ |
| ५ | चादर (ब्लॅकेट) धुणे | ८.२६ |
| ६ | गादीच्या खोळी धुणे | ७.७५ |

(कार्यवाही-साई आश्रम भक्तनिवास)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०६ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील आवश्यक वैद्यकीय अधिकारी रिक्त पदे जाहिरातीव्दारे तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी भरणेबाबत.

निर्णय क्र.२०३ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील आवश्यक वैद्यकीय अधिकारी रिक्त पदे जाहिरातीव्दारे तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी भरणेकामी उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली. तसेच याकामी खालील प्रमाणे निवड समिती गठीत करण्यात आली.

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी. — अध्यक्ष
२. उप संचालक, आरोग्य सेवा मंडळ किंवा डीन, बी.जे. मेडीकल कॉलेज, पुणे — सदस्य
३. जिल्हा शल्य चिकित्सक किंवा जिल्हा आरोग्य अधिकारी — सदस्य
४. मा.ॲड. सुहास ज.आहेर,सदस्य, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी. — सदस्य
५. मा.श्री.अविनाश अ.दंडवते, सदस्य, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी. — सदस्य
६. मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर, सदस्य, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी. — सदस्य

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०७ मे.गोदावरी खोरे ना.प.पा.ता.सह.दुध उत्पादक संघ, कोपरगाव व श्री स्वामी समर्थ डीस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांची टोन्ड गाय दुध दरामध्ये दरवाढ मिळणेचे मागणीबाबत.

निर्णय क्र.२०४ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.गोदावरी खोरे ना.प.पा.ता.सह.दुध उत्पादक संघ, कोपरगाव व श्री स्वामी समर्थ डीस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांनी मागणी केल्यानुसार टोन्ड गाय दुध दरामध्ये दि.०१.०२.२०२२ ते दि.१५.०२.२०२२ या कालावधीसाठी रु.०३.०० प्रति लिटर व दि.१६.०२.२०२२ पासून ते नविन ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत रु.५.५० प्रती लिटर प्रमाणे दरवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.

तसेच पॅकेज ड्रिंकींग वॉटरसाठी १ लिटर प्रती बॉटल करीता ८० पैसे व ५०० मिली प्रती बॉटल करीता ६० पैसे दरवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-खरेदी विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०८ श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विविध व्यवसायांचे जुने कालबाहय झालेले मशिन बदलून त्याजागी नविन (Machinery) खरेदीबाबत.

निर्णय क्र.२०५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विविध व्यवसायांचे जुने कालबाहय झालेले मशिनरी पैकी मे.मोटार व मे.ट्रॅक्टरसाठी आवश्यक साहित्य उदा. इंजीन, कट मॉडेल इत्यादी देणगी स्वरुपात मिळणेबाबत ॲटोमोबाईल क्षेत्रातील महिंद्रा कंपनीशी पत्रव्यवहार करणेस व त्यांचेकडून मिळणारे साहित्य देणगी म्हणून स्विकारणेस मान्यता देण्यात आली. सदर देणगी स्वरुपात मिळणा-या साहित्या व्यतिरीक्त उर्वरीत मशिनरी /इंजीन खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.३,२९,८६,४५३/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था)

---

मा.विश्वस्तांनी आयत्या वेळी घेतलेले ठराव

आयत्या वेळेचा विषय नं.०९
ठराव क्र.२०६ महाराष्ट्र राज्याचे माजी सहकार मंत्री, श्री साईबाबा संस्थानचे माजी उपाध्यक्ष, जेष्ठ नेते सहकार महर्षी मा.श्री. शंकररावजी कोल्हे साहेब यांचे दुखद निधन झालेले आहे. मा.व्यवस्थापन समितीचे वतीने तसेच प्रशासनाचे वतीने त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

---

आयत्या वेळेचा विषय नं.१०
ठराव क्र.२०७ साईभक्त डॉ.चितमपल्ली यांचे नुकतेच निधन झाले आहे. व्यवस्थापन समितीचे वतीने त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

---

आयत्या वेळेचा विषय नं.११
ठराव क्र.२०८ श्री साईबाबांचे समाधी शताब्दी वर्षामध्ये उभारण्यात आलेल्या कमानी पौराणिक स्वरुपाच्या व सुशोभित बनविण्यात याव्यात, त्याकरीता येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अशी माहिती दिली की, सदरचा रस्ता हा पुर्वी राज्य महामार्ग म्हणून अस्तित्वात होता. आता तो राष्ट्रीय महामार्ग म्हणून जाहीर करण्यात आलेला असल्याने याबाबत विहीत प्रक्रिया पुर्ण करुन कार्यवाही करण्यात यावी.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.१२
ठराव क्र.२०९ संस्थानचे विविध विभागात कार्यरत असलेले इनसोर्स व आऊटसोर्स कर्मचा-यांपैकी काम सोडून गेलेले कर्मचारी व त्यांचे जागी नव्याने नियुक्त केलेले कर्मचारी याबाबतचा मागील सहा महिन्याचा अहवाल मा.सदस्यांना देण्यात यावा. (कार्यवाही-कामगार विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.१३
ठराव क्र.२१० संस्थानचे विविध विभागात कार्यरत असलेले अंपग कर्मचारी यांची लिफ्टमन, रुग्णालयामध्ये डॉक्टरांचे कॅबीनवर अशा हलक्या स्वरुपाचे कामाचे ठिकाणी बदल्या करण्यात याव्यात. तसेच अशा कर्मचा-यांची स्वेच्छा निवृत्ती बाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पडताळणी करावी.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.१४
ठराव क्र.२११ श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय कडील ग्रंथपाल यांची संस्थानचे जनसंपर्क विभागामध्ये करण्यात आलेली नियुक्ती रद्द करण्यात यावी, असा निर्णय समिती सदस्यांनी घेतला.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सभेत सांगीतले की, संस्थान मधील कार्यक्रमांचे निमंत्रण मा.सदस्यांना जनसंपर्क कार्यालयाकडून विहित वेळेत दिले जात नाही. त्यामुळे जनसंपर्क

कार्यालयाची गैरसोय व त्याठिकाणी कर्मचा-याची आवश्यकता तसेच सदर कर्मचा-याची शैक्षणिक पात्रता व अनुभव या बाबी विचारात घेऊन त्यांचे मुळ पदाचे कामकाज सांभाळून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती केलेली आहे.

वरीलप्रमाणे सर्व बाबींवर चर्चा होवून समिती सदस्यांनी एकमताने ग्रंथपाल यांची जनसंपर्क विभागाकडे केलेली नियुक्ती रद्द करणेत यावी, यास मान्यता दिलेली आहे.

(कार्यवाही – सामान्य प्रशासन विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.१५

ठराव क्र.२१२ पुरवठाधारकांकडून करण्यात येणारा मालाचा पुरवठा ई-निविदेतील नमुद अटी शर्तीनुसार तसेच ठरवुन दिलेली गुणवत्ता व दर्जानुसार असेल तर मालाचा पुरवठा झाल्यानंतर १५ दिवसाचे आत सदर पुरवठाधारकाचे बिल अदा करणेबाबत कार्यवाही करणेत यावी. (कार्यवाही-लेखाशाखा)

---

आयत्या वेळेचा विषय नं.१६

ठराव क्र.२१३ मा.व्यवस्थापन समितीच्या दि.२४ जानेवारी,२०२२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५१ अन्वये गठीत करणेत आलेल्या उपसमितीमध्ये मा.अध्यक्ष महोदय व मा.श्री.रराहूल कनाल यांचा समावेश असणार नाही. उर्वरीत सर्व मा.सदस्यांना विचारणा करुन उपसमिती गठीत करण्यात यावी. उपसमिती सभेचे वेळी सर्वानुमते अध्यक्षांची निवड करण्यात यावी. सभेमध्ये अध्यक्ष निवडीबाबत नोंद घेण्यात यावी.

(कार्यवाही-सभा कामकाज विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.१७

ठराव क्र.२१४ श्री साईनिवास अतिथीगृह येथील सभागृह व जनसंपर्क कार्यालयाजवळील साई सभागृह येथील सीसीटीव्ही कॅमेरे काढून घेण्यात यावे. (कार्यवाही-सीसीटीव्ही कंन्ट्रोल विभाग )

---

आयत्या वेळेचा विषय नं.१८

ठराव क्र.२१५ संस्थानचे देणगी पेटीमध्ये तसेच इतर स्वरुपात मिळणा-या सर्व देणग्यांबाबतचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीला कळविण्यात यावा.

(कार्यवाही-लेखाशाखा)

---

आयत्या वेळेचा विषय नं.१९

ठराव क्र.२१६ संस्थानचे रुग्णालयातील डॉक्टरांना देण्यात येणारा इन्सेंटीव्ह कशा प्रकारे असावा याकामी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली अभ्यासगट तयार करण्यात येऊन त्याबाबचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीपुढे ठेवण्यात यावा. तसेच गैरशिस्त वर्तन करणा-या डॉक्टरांवर कारवाई करण्यात यावी. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

आयत्या वेळेचा विषय नं.२०

ठराव क्र.२१७ संस्थान कर्मचा-यांचे आगमन-निर्गमन वेळेसाठी असणारी थम पंचीग प्रणाली पुर्ववत सुरु करण्यात यावी. तसेच फेस रिडींग बाबत कार्यवाही करण्यात यावी. (कार्यवाही-कामगार विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.२१

ठराव क्र.२१८ श्री रामनवमी उत्सव-२०२२ समितीचे अध्यक्ष, पदाधिकारी व शिर्डी ग्रामस्थ मा.व्यवस्थापन समितीपुढे उपस्थित होते. त्यांनी सभेस सांगीतले की, कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे सन २०२० व २०२१ या दोन वर्ष कालावधीत श्री रामनवमी उत्सव साजरा करता आला नाही. त्यामुळे यावर्षी मोठया स्वरुपात उत्सव साजरा करण्याचा मानस आहे. श्री रामनवमी उत्सवामध्ये भव्य कुस्ती स्पर्धा, लावणी महोत्सव, बैलगाडी शर्यत, तमाशा, नाटक, फुड फेस्टिवल, भव्य ऐतिहासिक रांगोळी व लेजर शो इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. यासाठी मोठया प्रमाणात खर्च येणार असुन याकरीता

संस्थानमार्फत रक्कम रु.२५,००,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस लाख मात्र) आर्थिक मदत मंजूर करण्यात यावी, अशी मागणी केली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सव-२०२२ करीता संस्थानमार्फत रक्कम रु.२१,००,०००/-मात्र देणगी देण्यास मान्यता देण्यात आली. श्री रामनवमी उत्सव-२०२२ करीता कुस्ती हगामा व सांस्कृतीक कार्यक्रम याकरीता रक्कम रु.११,००,०००/-मात्रची अंदाजपत्रकी तरतुद करण्यात आलेली असल्याने याकरीता येणा-या वाढीव रक्कम रु.१०,००,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-लेखाशाखा)

---

आयत्या वेळेचा विषय नं.२२

ठराव क्र.२१९ शासनाने तयार केलेली खरेदी नियमावली संस्थानकरीता बंधनकारक आहे काय? याबाबत मार्गदर्शन मिळणेकामी शासनाकडे पत्रव्यवहार करण्यात यावा.

तसेच खरेदीबाबतच्या तांत्रिक व वाणिज्यीक ई-निविदा उघडतांना मा. समिती सदस्यांना निमंत्रीत करण्यात यावे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले की, शासन निर्णय क्र.भाखंस-२०१४/ प्र.क्र./८२/ भाग-III/उद्योग-४, दि.०१.१२.२०१६ अन्वये शासकिय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तीकेस मान्यता देण्यात आलेली आहे. सदर नियमपुस्तीकेमध्ये स्पष्टपणे उल्लेख आहे की, विधानसभेच्या कायद्याखाली स्थापित कोणतीही संस्था किंवा मंडळे किंवा महामंडळे किंवा प्राधिकरणे किंवा सोसायटी किंवा न्यास किंवा स्वायत्त संस्था तसेच अन्य कोणतीही संस्था ज्याला राज्य शासन या नियमपुस्तीकेच्या प्रयोजनासाठी एक खरेदी संस्था म्हणून अधिसूचित करु शकेल.व या संस्थेला राज्य शासनाकडून खरेदी करिता मोठया प्रमाणावर आर्थिक सहाय्य मिळत असेल अशा सर्व संस्थाना खरेदी धोरण लागू असल्याने सदरच्या सर्व प्राधिका-यांनी खरेदी धोरणाची तात्काळ अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदरची खरेदी नियमपुस्तीका संस्थानसाठी लागू आहे. (कार्यवाही-खरेदी विभाग/सभाकामकाज विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.२३

ठराव क्र.२२० संस्थानचे इमारतीमधील V.I.P. कक्ष वापराबाबत नियमावली तयार करण्यात यावी.

(कार्यवाही- सर्व निवासस्थान)

---

आयत्या वेळेचा विषय नं.२४

ठराव क्र.२२१ श्री साई प्रसादालयातील V.I.P. कक्षाचे नुतनीकरण करण्यात यावे.

(कार्यवाही- श्री साई प्रसादालय/बांधकाम विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.२५

ठराव क्र.२२२ श्री साई प्रसादालया करीता आचारी पदासाठी कंत्राटी पध्दतीने कर्मचारी घेणेबाबतचा प्रस्ताव ठेवण्यात यावा. (कार्यवाही- श्री साई प्रसादालय)

---

आयत्या वेळेचा विषय नं.२६

ठराव क्र.२२३ मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२४ व १२५ मधील संस्थान मालकीच्या जमीनीचे सीटी सर्व्हे नंबर वेगवेगळे आहेत ते एकत्रित करुन संपुर्ण जागेचा एक उतारा तयार करणेबाबत कार्यवाही करणेत यावी.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.२७

ठराव क्र.२२४ शिर्डी बसस्थानकासमोरील संस्थान मालकीचे जागेमध्ये माहिती सुविधा केंद्र व प्रसाद लाडू विक्री काऊंटर सुरु करणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.

(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग/लाडू प्रसाद निर्मिती विभाग)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.२८**

**ठराव क्र.२२५ गेट नं.०१ साईभक्तांना प्रवेशासाठी सुरु करण्यात यावे. तसेच जनसंपर्क कार्यालयाच्या पास वितरणासाठी असलेल्या खिडक्या पुर्ववत सुरु करण्यात याव्यात.**

**(कार्यवाही-संरक्षण विभाग/जनसंपर्क कार्यालय)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.२९**

**ठराव क्र.२२६ मा.व्यवस्थापन समिती सदस्यांची नावे असलेला फलक पुर्वीप्रमाणे मंदिर परिसरात लावण्यात यावा.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.३०**

**ठराव क्र.२२७ साईआश्रम फेज-१ या इमारतीचा तत्कालीन व्यवस्थापन समितीने केलेल्या भुमिपूजन समारंभाचा फलक अद्याप लावण्यात आलेला नाही. तो तात्काळ लावण्यात यावा.**

**(कार्यवाही-श्री साईआश्रम भक्तनिवास-बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.३१**

**ठराव क्र.२२८ साईलीला अंकात फक्त श्री साईबाबांशी निगडीत माहिती असावी. पुर्वीप्रमाणे मा.सदस्यांची नावे छापण्यात यावी. या मासिकात श्री साईबाबांवर आधारीत लेख लिहणा-या लेखकांची माहिती देण्यात यावी. साईलीला मासिक या अंकास सन २०२३ मध्ये १०० वर्ष पुर्ण होत आहे. मासिकाचे प्रकाशन शिर्डी येथुन करण्यात यावे, या मासिकाचे कार्यकारी संपादक बदलण्यात यावे.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.३२**

**ठराव क्र.२२९ साई आश्रम निवासस्थान व साई धर्मशाळा या ठिकाणी सुरु असलेले पुस्तक विक्री स्टॉल दोन शिफ्ट मध्ये सुरु करण्यात यावे. व्दारावती येथे पुस्तक विक्री स्टॉल सुरु करण्यात यावे.**

**(कार्यवाही- प्रकाशने विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.३३**

**ठराव क्र.२३० मागील निविदाधारकांना मुदतवाढ द्यावी लागणार नाही याप्रमाणे नियोजन करुन ई-निविदा प्रक्रियेबाबची कार्यवाही करण्यात यावी. (कार्यवाही-सर्व विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.३४**

**ठराव क्र.२३१ न्युयॉर्क येथील साईभक्तांनी श्री साईबाबांचे जीवनावर आधारीत नाटक विनामुल्य सादर करणेस परवानगी मागीतलेली आहे. नाटकांची स्क्रिप्ट तपासूण त्यांना परवानगी देण्यात यावी.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.३५**

**ठराव क्र.२३२ श्रींचे दर्शनासाठी असणारी बायोमेट्रीक पास प्रणालीमध्ये त्रुटी असल्यामुळे ती दि.१ एप्रिल, २०२२ पासून बंद करण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले. त्यानुसार दि.१ एप्रिल, २०२२ पासून बायोमेट्रीक पास प्रणाली बंद करणेबाबत प्रशासनाला निर्देश दिले.**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग/संरक्षण विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.३६**

**ठराव क्र.२३३ सी.सी.टी.व्ही. कॅमेरे जुने झालेले आहेत, त्यामधुन पिक्चर व्यवस्थीत दिसत नाही. ते बदलण्यात यावे. सीसीटीव्ही विभागातील कर्मचा-यांची बैठक व्यवस्था बदलण्यात यावी.**

**(कार्यवाही- सी.सी.टी.व्ही. कंन्ट्रोल सेल)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.३७**

**ठराव क्र.२३४** **संस्थानमध्ये साजरे होणारे सर्व सण, उत्सव व कार्यक्रम यांचे निमंत्रण सर्व मा.सदस्यांना देण्यात यावे,**

**(कार्यवाही-जनसंपर्क विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.३८**

**ठराव क्र.२३५** **मंदिर परिसरामध्ये अगरबत्ती स्टॉल चालविणेकामी जनसेवा फाऊंडेशन, लोणी यांचे सोबत करण्यात आलेल्या करारनाम्याचे अवलोकन केले असता त्यामध्ये अनेक त्रुटी आढळून येतात. सदर करारनाम्याची संस्थानचे विधी विभागामार्फत तपासणी करण्यात यावी. याबाबत संबधीतावर योग्य ती कारवाई करण्यात यावी. तसेच अगरबत्ती पाकीटावर संस्थानचा लोगो वापरण्यात येतो याबाबत Copy Right संदर्भात कारवाई करण्यात यावी.**

**(कार्यवाही-बगीचा विभाग/सामान्य प्रशासन विभाग/विधी विभाग)**

---

**वरील निर्णय क्र.१५७ ते २३५ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर रात्रौ.०९.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| (भाग्यश्री बानायत,भा.प्र.से.) | (ना.आशुतोष अशोकराव काळे) |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**